
Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume - IX, Issue - I
January - March - 2020
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - I

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>**डॉ. मुळे पी. एम.** | १-३ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य : एक आढावा<br>**प्राचार्य डॉ. बबन पवार** | ४-७ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर एक आकलन<br>**प्रा. डॉ. अंगद पवार** | ८-१० |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून हिंदू कोड बील : समकालीन समाजवास्तव<br>**प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे** | ११-१४ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रामीण विकास व कृषी क्षेत्रातील योगदान<br>**डॉ. विनायक नागोराव शिंदे** | १५-१७ |
| ६ | सामाजिक परिवर्तनाचा आधारवड : डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. आरगडे अंबादास** | १८-२२ |
| ७ | शिवकालीन आर्थिक धोरणाचा अभ्यास<br>**डॉ. ज्ञानेश्वर जिगे** | २३-२७ |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार<br>**प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे** | २८-३१ |
| ९ | महात्मा ज्योतीराव फुले यांचे शैक्षणिक व आर्थिक विचार<br>**प्रा. डॉ. संजय मगर** | ३२-३७ |
| १० | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांची वर्तमानकालीन प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. श्रध्दानंद माने** | ३८-४३ |
| ११ | उपविषय- फुले दांम्पत्याचे स्त्रीविषयक विचार<br>**प्रेरणा दिलीप दीक्षित** | ४४-५१ |
| १२ | राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्योध्दराचे कार्य<br>**विठ्ठल बाबूराव गुंडे** | ५२-५४ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि आजची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. शिवाजी नामदेव झांझूरणे** | ५५-५७ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार<br>**डॉ. सुनिल अण्णा गोरडे** | ५८-६१ |
| १५ | वर्तमान काळात म. जोतीराव फुले यांच्या स्त्री-विषयक विचाराची प्रासंगिकता<br>**अर्चना वैजनाथ घोडके** | ६२-६७ |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार आणि प्रासंगिकता<br>**प्रा. संजय कि. भालेराव** | ६८-७४ |
| १७ | समाजप्रबोधनकार संत एकनाथ<br>**प्रा. डॉ. विनोद बाबूराव बोरसे** | ७५-७८ |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन<br>**प्रा. इंगळे किशोरकुमार मनोहरराव** | ७९-८२ |
| १९ | महात्मा गांधीजीच्या सर्वोदय संकल्पनेचा अभ्यास<br>**प्रा. पवार बंडू थावरा** | ८३-८६ |
| २० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्र विषयक विचार<br>**डॉ. पी. एन. डापके** | ८७-८९ |
| २१ | शरण संत बसवण्णा यांच्या सामाजिक विचारांची प्रासंगिता<br>**बिराजदार विजयकुमार गोविंद** | ९०-९४ |
| २२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांची- प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. चव्हाण सुखदेव गोविंदराव** | ९५-१०० |
| २३ | महात्मा गांधी यांचे स्त्री विषयक विचार<br>**प्रा. दांडगे एल. जी.** | १०१-१०३ |
| २४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशासकिय विचार व प्रासंगीकता<br>**डॉ. अशोक लक्ष्मणराव गोरे** | १०४-१०६ |
| २५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक विचारसरणी व कार्य<br>**डॉ. शशिकांत दत्तोपंत परळकर** | १०७-१०९ |
| २६ | भारतीय अर्थशास्त्राचे जनक दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार<br>**डॉ. बी. एम. सोनवणे** | ११०-११४ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | वर्तमानात महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची आवश्यकता<br>**डॉ. नानासाहेब भाऊसाहेब दाभाडे** | ११५-११९ |
| २८ | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार<br>**सचिन बाबुराव मुंडे** | १२०-१२४ |
| २९ | सद्यकालीन परिस्थीतीमध्ये तुकडोजी महाराजांच्या विचारांची उपयुक्तता<br>**शुंभागी विजयराज मोहोड** | १२५-१३० |
| ३० | वर्तमान काळात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचार आणि कार्याची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. अनिल म्हाळाप्पा गाडेकर** | १३१-१३५ |
| ३१ | वर्तमान काळात राजर्षी शाहु महाराज यांच्या विचारांची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. पंडीत गडकरी** | १३६-१३७ |
| ३२ | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार व कार्य<br>**प्रा. डॉ. संजय बाबुराव वाकळे** | १३८-१४० |
| ३३ | महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक विचारांची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. अप्पाराव चंद्रराव गायकवाड**<br>**प्रा. डॉ. आदमाने भाऊसाहेब बंकट** | १४१-१४४ |
| ३४ | महात्मा ज्योतिबा फुले यांचे अस्पृश्य विषयक विचार<br>**प्रा. नवानाथ ज्ञानोबा पवळे** | १४५-१४८ |
| ३५ | सशक्त व समर्थ राष्ट्र बांधणीसाठी स्वामी विवेकानंदाच्या विचाराची उपयुक्तता<br>**डॉ. संतोष सुधाकरराव कोदुरवार** | १४९-१५२ |

# २६. भारतीय अर्थशास्त्राचे जनक दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार

डॉ. बी. एम. सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र, विभाग म. स. गा. महाविद्यालय मालेगाव कॅम्प, नाशिक.

**प्रास्ताविक**

भारतात आर्थिक विचारांना थोर परंपरा लाभलेली आहे. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर भारतातील अर्थतज्ज्ञांच्या आर्थिक विचारांना अर्थशास्त्रात एक मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्यापूर्वी भारतात ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन होते. ईस्ट इंडिया कंपनीला इ.स. 1600 पासुन व्यापार करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली होती. मात्र व्यापाराच्या नावाखाली इंग्रज भारताची कशा प्रकारे आर्थिक लुट करून येथील लोकांची पिळवणुक करीत आहे. हे दादाभाई नौरोजी यांनी स्पष्ट करून सांगितले. दादाभाई नौरोजी भारतातील तत्कालीन महान विचारवंत होते त्यांची शिक्षणतज्ज्ञ म्हणुन देखील ओळख होती. ते कापसाचे व्यापारी म्हणुन सगळ्यांना परिचीत होते. भारतातील जनतेला गुलामगिरीची जाणीव त्यांनी त्याकाळी करुन दिली होती. पारशी आणि इंग्रजी भाषेवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याऱ्या स्वातंत्र्या लढ्यातील ते प्रारंभीच्या पिढीतील नेते होते. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी 1885 मध्ये 'भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस' पक्षाची स्थापना करण्यात आली आणि त्यात दादाभाई नौरोजींचा सक्रिय सहभाग होता म्हणुन ते 1886, 1893 व 1906 मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष राहिले होते. त्यांनी आपले समाजकार्य करण्यासाठी ज्ञान प्रसारक मंडळ, बॉम्बे असोसिएशन, लंडन इंडियन असोसिएशन आणि ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना केली व आपल्या विचारांना कार्याची जोड दिली.

दादाभाई नौरोजी यांनी आपल्या बुध्दीमत्तेची जाणीव ब्रिटीशांना करून दिलेली होती. याचीच दखल घेत इ. स. 1892 ते 1895 या कालखंडात ब्रिटीश संसदेच्या कनिष्ठ सभागृहात त्यांना खासदार म्हणुन निवडुण पाठविण्यात आले होते. अशा या महान व्यक्तीच्या आर्थिक विचारांचा आढावा प्रस्तुत लेखात करण्यात आलेला आहे.

उद्दिष्टे

१. दादाभाई नौरोजी यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती अभ्यासणे.

२. दादाभाई नौरोजी यांची राजकिय कार्याची माहिती अभ्यासणे.

३. दादाभाई नौरोजी यांची आर्थिक विचारांची माहिती अभ्यासणे.

४. दादाभाई नौरोजी यांची आर्थिक विचारांची उपयुक्तता अभ्यासणे.

संशोधन प्रणाली

प्रस्तुत लेखाच्या निर्मीतीसाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करुन घेतलेला आहे. यासाठी विविध संकेतस्थळे, मासिकांमध्ये प्रकाशित लेखांचा संदर्भ घेतलेला आहे. प्राप्त माहितीच्या सादरीकरणासाठी विश्लेषण तंत्राचा उपयोग केलेला आहे.

विश्लेषण

दादाभाई नौरोजी यांचा जन्म मुंबई पासुन जवळच 'वर्सोवा' या ठिकाणी 04 सप्टेंबर 1825 मध्ये झाला. पारसी कुटूंबात जन्मलेला हा युवक कुशाग्र बुध्दीमत्तेचा होता. तत्कालीन इंग्रजी भाषेची ज्ञान असलेला हा युवक मुंबई येथून कापसाचा व्यापार करणारा व्यापारी होता. शिक्षणाची आवड असल्यामुळे त्यांनी 1845 मध्ये 'स्टुडंट्स लिटररी सायंटिफिक सोसायटी' या संस्थेची स्थापना करुन इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला दादाभाई नौरोजी यांची इंग्रजी भाषेची ओढ व शिकवण्याची तळमळ बघुन इग्रजांनी मुंबई येथील प्रसिध्द अशा एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणुन नियुक्त केले. ते या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणुन नियुक्त झालेले पहिले भारतीय होते.

भारतात अलिकडे इंग्रजी शिक्षणावर विशेष भर असल्याचे इंग्रजी शाळेत दाखल होणाऱ्या विद्यार्थी संख्येवरुन लक्षात येते. दादाभाई नौरोजी यांच्या शैक्षणिक दृष्टीकोणाला आजच्या शिक्षण प्रणालीत प्रमुख स्थान असल्याचे निदर्शनास येते. दादाभाई नौरोजी प्राध्यापक म्हणुन नियुक्त झाले त्याकाळी भारताची जनता निरक्षर व भाबडी होती अशा जनतेला शिकविणे तेही इंग्रजीत. पण दादाभाई नौरोजींनी तेव्हा हे आव्हाण समर्थपणे पेलले होते.

दादाभाई नौरोजींच्या शैक्षणिक कार्याबरोबरच राजकिय कार्याची देखील दखल घेणे आवश्यक वाटते. कारण राजकीय कार्यामुळे शासकीय ध्यैय धोराणांची सखोल माहिती होत असते. शासन जनतेचे शोषण करणारे निर्णय घेते आहे की, लोककल्याणाचे निर्णय घेते आहे यांची जाणीव आधी राजकारणात असणाऱ्या व्यक्तीना होते. यासाठी दादाभाई नौरोजींच्या राजकीय कारकिर्तीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. इंग्लंडच्या कनिष्ठ सभागृहात (हाऊस ऑफ कॉमन्स) ते इंग्लंडमधुन निवडुन खासदार झाले त्यांना पहिले भारतीय खासदार होण्याचा मान मिळाला. ते इ.स.1892 ते 1895 या काळात खासदार म्हणुन असताना ब्रिटीशांच्या परकिय व्यापार धोरणाचा बारकाईने अभ्यास करीत होते. तेव्हा त्यांचे खाजगी सचिव म्हणुन महंमद अली जिना हे काम बघत होते. यावरून असे लक्षात येते की, बॅरिस्टर महंमद अली जिना यांना समाज कारणाचे व राजकारणाचे धडे दादाभाई नौरोजी यांच्या कडुन मिळाले होते.

इंग्लंडच्या राजकारणात कार्यरत असतानाच ते भारताच्या समाजकारणात देखील सक्रिय होते. 1885 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी स्थापन केलेल्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे ते ए. ओ. ह्यूम, दिनशा एडलजी वाच्छा यांच्या सह संस्थापक सदस्य होते. तीन वेळा ते भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणुन नियुक्त झाले. यामुळे त्यांना ब्रिटीशांचे ध्यैयधोरण व भारतीय जनतेचे विचार यांची पुर्ण कल्पना होती. स्वातंत्र्य संग्रामातील पहिल्या पिढीतील नेतृत्व त्यांनी केले होते म्हणुन त्यांना भारताच्या राजकारणातील 'भिष्माचार्य' असे देखील संबोधले जाते. दादाभाई नौरोजी भारताच्या राष्ट्रवादाचे प्रणेते होते. त्यांना 'भारताचे पितामह' असे देखील संबोधले जाते.

दादाभाई नौरोजी कापुस व्यापारी होते. त्यामुळे ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला कापुस विकताना ब्रिटीशांची व्यापार करण्याची पध्दत त्यांनी अनुभवली होती. ब्रिटीश संसदेत असतांना ब्रिटीशांची भारता संदर्भात व्यापार निती कशा स्वरूपाची होती हे त्यांनी अनुभवले होते. ब्रिटीश भारतीय जनतेची व्यापाराच्या नावाखाली किती व कशा स्वरूपात आर्थिक लुट करतात हे त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी 'पॉव्हर्टी न्ड अनब्रिटीश रूल इन इंडिया' या नावाचा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथात त्यांनी 'आर्थिक निस्सारनाचा सिध्दांत' (Theory of Drain of Wealth) मांडला यात त्यांनी ब्रिटीश

भारतीय जनतेची व्यापाराच्या माध्यमाने कशा प्रकारे लुट करून इंग्लंड मध्ये घेऊन जातात याचे विवेचन केले आहे. ब्रिटीशांनी भारतीय जनतेकडे असलेला विक्री योग्य माल केवळ ब्रिटीशांनाच विकावा अशी सक्ती केलेली होती ब्रिटीश भारतीय जनतेकडुन स्वस्तात माल खरेदी करून तो दुसरीकडे महाग किंमतीला विकुन गडगंज नफा कमवित होते. दादाभाईनी आपल्या सिध्दांत ब्रिटीश त्यांच्या प्रशासनाचा बहुतांश आर्थिक भार भारतीय जनतेवर टाकुण त्यांचा प्रशासकीय खर्च कसा वाचवतात हे स्पष्ट करून सांगितले. दादाभाईंनी आर्थिक निस्सारण सिध्दांतात ब्रिटीश त्यांचा प्रशासकीय खर्च पुढील प्रमाणे भारताच्या जनतेवर टाकतात असे पुढील उदाहरणांच्या सहाय्याने दाखवुन दिले.

१. ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते आणि निवृत्ती वेतन भारतीयांकडुन देणे.

२. 'बोर्ड ऑफ कण्ट्रोल' व 'बोर्ड ऑफ डायरेक्टर्स' यांचे वेतन व भत्ते भारतीयांकडुन देणे.

३. 1858 नंतर ईस्ट इंडिया कंपनीची सर्व देयके भारतीयांकडुन देणे.

४. साम्राज्य विस्तारात भारतीय सेनेचा वापर करणे यामुळे इंग्रजांच्या संरक्षण खर्चात 52% पर्यंत बचत.

५. रेल्वे सारख्या मुलभूत उद्योगात गुंतवणूक करण्याऱ्या ब्रिटीश उद्योजकांना नियमित लाभ भारतीयांकडुन देणे.

६. ब्रिटीशांना खाजगी व्यापारात मिळालेला नफा इंग्लडला घेऊन जाणे.

७. ब्रिटीशांना भेट स्वरूपात मिळालेले धन इंग्लडला घेऊन जाणे.

वरील प्रमाणे इंग्रज भारतीय जनतेची आर्थिक लुट करतात. विकास आणि व्यापाराच्या माध्यमाने भारतातील धन हे इंग्लडमध्ये जाते. यामुळे इंग्लड आर्थिक दृष्ट्या समृध्द झाला आणि भारत मात्र आर्थिक दृष्ट्या दूर्बळ झाला याला दादाभाई नौरोजी ब्रिटीश शासन भारतीय जनतेची रक्त शोषन करते असे म्हणतात. आज भारताला स्वातंत्र्य मिळून 70 वर्ष पुर्ण झालेत आजही दादाभाई नौरोजींच्या आर्थिक विचाराचे महत्व पूर्वीइतकेच आहे असे म्हणावे लागते.

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

**निष्कर्ष**

दादाभाई नौरोजी समग्र दृष्टीकोन असलेले व्यापारी, शिक्षणतज्ज्ञ, समाजकारणी, राजकारणी व अर्थतज्ज्ञ होते. त्यांच्या कारकिर्तीत त्यांनी या सर्व क्षेत्रात कुशाग्र बुध्दीमत्तेची जगाला जाणीव करून दिली ते ब्रिटीश नियुक्त पहिले प्राध्यापक, इंग्लडमध्ये निवडून आलेले पहिले भारतीय खासदार होते. ब्रिटीशांच्या व्यापार धोरणाचा व नितीचा त्यांनी बारकाईने अभ्यास केलेला होता. म्हणुन आर्थिक निस्सारणाच्या सिध्दांताच्या माध्यमाने त्यांनी ब्रिटीश भारताची कशी सोयीस्कर रित्या लुट करतात हे स्पष्ट करून सांगितले म्हणुन त्यांना भारतीय अर्थशांस्त्राचे जनक असे संबोधले जाते.

**संदर्भ**

१. https://mr.m.wikipedia.org
२. https://m.youtube.com
३. https://mpscacademy.com
४. **निंबाजीराव पवार, "दादाभाई नौरोजी : भारतीय राजकारणातील भीष्माचार्य", व्यक्तीचित्रण.**